# 'रयत' ने बदलणाऱ्या शिक्षणाची खबरदारी घ्यावी

## शरद पवार; आयबीएमशी लवकरच करार, विद्यार्थ्यांना मिळणार नोकरीची हमी

**सातारा / प्रतिनिधी**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण पोहोचविले. यामुळे रयत शिक्षण संस्था ही देशातील सर्वात महत्वाची संस्था झाली आहे. पूर्वीची [illegible]त आज वेगळ्या वळणावर आहे. त्यावेळी शिक्षीत अन अशिक्षीत असे समजण्याचा काळ पण आज रयत संस्था ही जगातील बदलांची नोंद घेत वेगळ्या वळणावर आली आहे. त्यामुळे आता जगातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या आयबीएमशी करार करुन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे (कृत्रीम बुध्दीमत्ता) ज्ञान घेण्याची सुविधा उपलब्ध करण्याबाबत लवकरच करार करणार आहे. रयतमधील शिक्षकांनीही या बदलाला सामोरे जाण्यासाठी खबरदारी घेणे तितकेच गरजेचे आहे. हा विषय रेग्युलर शिक्षणाच्याबरोबर असल्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरीची हमी ही असणार असल्याचे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, खा. शरद पवार यांनी सांगितले.



सातारा : शरद पवार यांचा डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी खा. श्रीनिवास पाटील, दिलीप वळसे पाटील, डॉ. अनिल पाटील, विठ्ठल शिवणकर आदी. (छाया : ओमसंकेत)

सातारा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात खासदार शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त तसेच रयत शिक्षण संस्थेतील ५० वर्षांच्या सक्रिय योगदानाबद्दल अभिष्टचिंतन आणि कृतज्ञता सोहळ्याच्या आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी खासदार श्रीनिवास पाटील होते. यावेळी सिंबॉयसिसचे डॉ. शा. ब. मुजुमदार, खासदार श्रीनिवास पाटील, आ. दिलीप वळसे पाटील, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, उपाध्यक्ष ॲड. भगिरथ शिंदे, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य राजेंद्र साळुंखे, आ. बाळासाहेब पाटील, आ. मकरंद पाटील, आ. शशिकांत शिदे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले, कर्मवीरांनी सर्वसामान्यांपर्यंण शिक्षण पोहोचविले आहे. रयत देशातील सर्वात महत्वाची संस्था आहे. आता रयत वेगळ्या वळणावर आहे. डॉ. अनिल पाटील यांनी खांद्यावर जबाबदारी घेऊन प्रारंभ केला आहे. जगातील बदलांची नोंद घेऊन त्याप्रमाणे शिक्षण देण्याची आज आवश्यकता आहे. त्यासाठी आम्ही जगातील सर्वात मोठी कंपनी आयबीएमसोबत कृत्रीम बुद्धीमत्तेचे ज्ञान देण्याची सुविधा उपलब्ध करणार आहोत.यासाठी हे शिक्षण १९ हजार रुपयांचे असणार आहे. आयबीएम कंपनीने हेच सांगितले आहे की, येणारी नवी पिढी हा देशात कुठेही जॉब करण्याची तयारी दाखवणारी असेल तर त्यांना आम्ही त्याच दर्जाचे शिक्षण देवून त्यांचे चांगले, करिअर घडवू, त्यामुळे रयतमधील शिक्षकांनीही आता या बदलाची नोंद घेवून सामोरे जाण्याची आवश्यकता आहे.

जे विद्यार्थी दहावी, बारावी तसेच पदवीधर होत आहेत, त्या विद्यार्थ्यांनीही हा विषयही घ्यावा. यासाठी अशा विद्यार्थ्यांना देशाच्या कानाकोपऱ्यात काम करणाऱ्यांना कुठेही नोकरीची हमी दिली जाणार आहे. कर्मवीरांनी संस्था सुरु केली तेव्हा शिक्षित आणि अशिक्षित अशी स्थिती होती. आता परिस्थिती वेगळी आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैचारीक दृष्टीकोन वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

श्रीनिवास पाटील म्हणाले, १९७२ ते २०२३ या दरम्यानचे ५० वर्षे कारकीर्दीचा मित्राचा गौरव हा मनाला लय भारी वाटत आहे. आपला मारुती म्हणजे रामशेठ ठाकुर होय. हा रयतच्या व्यवस्थेसाठी कोटीच्या कोटी उड्डाणे घेत आहे. मजुरी केलेला हा माणुस पण आज रयतसाठी कोट काढून देण्याची पण तयारी ठेवत आहे, हा आनंद आहे. या समारंभात अध्यक्ष व्हावे पणं एवढी काय पात्रता नाही, त्यामुळे कोणत्याही कार्यक्रमात शरद पवार यांच्या कार्यक्रमात कायम डाव्या बाजूला आम्ही नेहमीच असतो. साताऱ्यातील पावसातील सभेतही डाव्याच बाजूला. आमचे गुरु यशवंतराव चव्हाण हे साताऱ्याचे खासदार मी दोन वेळा कराडचे खासदार. मग काय माझ्याही डोक्यात आपण साताऱ्याचे खासदार केव्हा व्हायचे असा विचार असताना मध्येच गर्व्हनर झालो. पुन्हा घरी आलो पण नशिबात असतं साताऱ्याचे खासदार होण्याचे मग काय शरद पवार यांनीं बोलवून सांगितले श्रीनिवास साताऱ्याचे खासदार त्याप्रमाणे साताऱ्याचे खासदार झालो, असे अनेक किस्से सांगत शरद पवार यांच्यासह संपूर्ण सभागृह तितकीच दाद देत होते.

### मित्राचा गौरव कौतुक मनाला लय भारी वाटतं

मित्राच्या गौरव सोहळ्यानिमित्त श्रीनिवास पाटील यांनी अनेक किस्से सांगितले त्यातील एक किस्सा चायनाचं युध्द सुरु झालं अन शरद पवार साहेब म्हणाले आपण फार मोठी मिरवणूक काढायची. तर म्हटलं काढूया मग पण काय करायचं तर पत्रक लावायची अगोदर, मग त्या पत्रकाचा बिंडा माझ्या सायकलला. मग त्यावेळी दुसऱ्या एका मित्राच्या घरात खळ करायची अन ती पत्रकाला हाताने लावायची. पण तो काळ ऐन थंडीचा. शरद पवार हे माझ्यापेक्षा दोन बोटांनी उंच. मग पवारसाहेब हे म्हणायचे माझी उंची जास्त मग मी पत्रक लावतो, हा उंचीचा फायदा कसा असतो हे सांगताच सभागृहात हस्या पिकला. तरी पण माझ्या मित्राचा गौरव कौतुक होत आहे, हे मनाला लय भारी वाटत आहे, असे खा. श्रीनिवास पाटील यांनी सांगितले.